**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ०८/२०१८ मधील</u>**
**<u>नि.०५ खालील आदेश</u>**
**<u>(पारीत दि.२०.०७.२०२०)</u>**

१. वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८, आदेश ३९ नियम १ व २ अन्वये अर्ज दाखल करून प्रतिवादी क्र. १ विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करणेची विनंती केली आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, मौजे भैरववाडी, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग येथील खालील मिळकती या ''दावा मिळकती'' आहेत.

| अ.क्र. | सर्व्हे नं. | जुना सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र<br>(हे) (आर) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १. | ७१ | १८५ | २० | ०—०५—०१<br>पो.ख. ०—०१—० | ०—३० |
| २. | ७१ | | २१ | ०—०४—०१<br>पो.ख. ०—०१—० | ०—२३ |
| ३. | ७१ | | २९ | ०—०४—०६<br>पो.ख. ०—०१—२ | ०—०९ |
| ४. | ७२ | १८२ | ४ | ०—२४—५<br>पो.ख. ०—०२—६<br>————————<br>०—२७—१<br>पैकी वाटपास पात्र मिळकत<br>०—०५—०<br>पो.ख. ०—०२—६<br>——————————<br>०—०७—६ | ०—८५ |
| ५. | ७४ | १८८ | १३ | ०—०८—०<br>पो.ख. ०—०२—० | ०—०३ |
| ६. | ७४ | | १५ | ०—०५—०<br>पो.ख. ०—०१—० | ०—०२ |
| ७. | ७४ | | ३६ | ०—१०—०<br>पो.ख. ०—०३—० | ०—०३ |
| ८. | ७४ | | ४३ | ०—४३—०<br>पो.ख. ०—१०—० | ०—११ |
| ९. | ७५ | १८१ | ४क | ०—१६—०<br>पो.ख. ०—०३—० | ०—०४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०. | ७८ | १८१ | १ब | ०—६३—०<br>पो.ख. ०—२०—० | ०—२० |
| ११. | ७९ | १९२ | २ | ०—४६—०<br>पो.ख. ०—०५—३ | १—८९ |
| १२. | ८३ | १९५ | १क | ०—०४—०<br>पो.ख. ०—०१—० | ०—०२ |

३. वादींचे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे मूळ पुरुष रामा उर्फ रामचंद्र गणू तळवणेकर सन १९६८ मध्ये मयत झाले. त्यांची पत्नी सिताबाई या देखील मयत आहेत. रामा यांना विठोबा, गोपिकाबाई, कमळाबाई व कृष्णाबाई ऊर्फ जिजाबाई अशी चार मुले होती. विठोबा मयत असून त्यांना प्रतिवादी क्र. २ ते ४ हे कायदेशीर वारस आहेत. कृष्णाबाई ऊर्फ जिजाबाई यांना वादी व प्रतिवादी क्र. १ हे कायदेशीर वारस आहेत. गोपिकाबाई व कमळाबाई ह्या देखील मयत असून त्यांना वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ हेच वारस आहेत. दावा मिळकत क्र. १, २, ४, ६ ते १२ या मिळकती वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या एकत्र कुटुंबाची कुळ कायद्याखाली विक्री झालेली मिळकत असून दावा मिळकत अ.क्र. ५ ही वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या पूर्वजांनी खरेदीखताने विक्री घेतलेली मिळकत आहे. दावा मिळकत क्र. ३ या मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ हे कूळ आहेत.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, हिंदू वारसा कायद्यानुसार विठोबा, गोपिकाबाई, कमळाबाई व कृष्णाबाई ऊर्फ जिजाबाई यांना प्रत्येकी १/४ हिस्सा प्राप्त होतो. गोपिकाबाई व कमळाबाई यांचे पश्चात त्यांचा हिस्सा वादी व त्यांचे कायदेशीर वारस प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे हिश्यात समाविष्ट होतो. त्यानुसार दावा मिळकतीत प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचा एकत्रित १/२ हिस्सा आहे व वादी आणि प्रतिवादी क्र. १ यांचा प्रत्येकी १/४ हिस्सा आहे. प्रतिवादी क्र. ५ ते ७ दावा मिळकत क्र. ३ चे मालक असून वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नांवाची या मिळकतीच्या सातबारा पत्रकी कूळ म्हणून नोंद आहे. प्रतिवादी क्र. ८ ते १२ हे वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे दावा मिळकत क्र. ४ मध्ये सह—हिस्सेदार आहेत. प्रतिवादी क्र. १४ चे नांव चुकीने दावा मिळकत क्र. ५ या

मिळकतीमध्ये नोंद झाले आहे.

५. वादीचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकतींचे अद्यापही सरस निरस मानाने धडे वाटप झालेले नाही. त्यामुळे वादीला त्यांच्या हिश्याच्या मिळकतीमध्ये शेती करणे, झाडांची लागवड करणे वगैरे अडचणीचे आहे. दरम्यान दि. २६/१२/२०१७ रोजी प्रतिवादी क्र. १ यांनी वादी किंवा अन्य प्रतिवादी यांची संमती न घेता दावा मिळकत क्र. ५ मध्ये बेकायदेशीरपणे घराचे बांधकामास सुरवात केली. या बांधकामास ग्रामपंचायत किंवा तत्सम सरकारी वा निमसरकारी कार्यालयाची देखील परवानगी घेतली नाही. वादीने त्यास बांधकाम न करणेबाबत सांगून ही ऐकणेस तयार नाहीत. त्यामुळे वादीने त्याच दिवशी ग्रामसेवक, ग्रामपंचायत भैरववाडी कारीवडे यांना या बेकायदेशीर बांधकामाबाबत कारवाई होणेचा अर्ज दिला. दावा मिळकतींचे अद्यापी धडेवाटप झाले नसताना आणि हिस्से ठरले नसताना प्रतिवादी क्र. १ ने सामाईक मिळकतीत घराचे बांधकाम केलेस ते अडचणीचे ठरुन वादी व अन्य प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. तसेच दाव्याचा निर्णय होणेस बराच अवधी लागणार असलेमुळे दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिवादी क्र. १ वा तर्फे इसम यांनी दावा मिळकतीमध्ये बांधकाम करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम पारीत होणेची विनंती केली आहे.

६. प्रतिवादी क्र. १ यांनी नि.३९ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन वादीच्या अर्जातील कथनास व मागणीस आक्षेप घेतला आहे. त्यांचे असे कथन आहे की, दावा मिळकती ह्या प्रतिवादी क्र. २ ते ४ यांच्या मालकीच्या असून प्रतिवादी क्र. २ यांनी कूळ कायद्याखाली विक्री घेतल्या आहेत. त्याचेशी वादी, प्रतिवादी क्र. ५ ते १४ यांचा हक्कसंबंध नाही. वादीने नलिनी घनःश्याम मयेकर यांचे मुलगे कृष्णा, नारायण व इतर ३ मुली तसेच कल्याणी काशीनाथ धुरी, उषा काशीनाथ धुरी आणि गोपिकाबाई व कमळाबाई यांच्या कायदेशीर वारसांना मूळ दाव्यात पक्षकाम नेमलेले नाही असा त्यांनी उजर घेतला आहे. त्यांचे पुढे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ हे आपापल्या हिश्याप्रमाणे दावा मिळकती भोगत आहेत. दावा मिळकत क्र. ५ मध्ये ते घर बांधत आहेत हे वादीचे कथन त्यांनी स्पष्टपणे नाकारले आहे. तथापि प्रतिवादी क्र. ४ हिने दावा मिळकतीमध्ये ग्रामपंचायत कारीवडे घर नं. १२५३ हे ३६.६ फूट X

३२.३ फूट लांबी रुंदीचे राहते घर आवश्यक त्या शासकीय परवानग्या घेवून बांधले असून या घराची सन २०१७—२०१८ करीता घरपट्टी कर देखील प्रतिवादी क्र. ४ यांनी भरला असून या घराशी प्रतिवादी क्र. १ यांचा कोणताही हक्कसंबंध नाही असा खुलासा त्यांनी केला आहे. या सर्व कारणास्तव त्यांनी वादीचा अर्ज नामंजूर होणेची विनंती केली आहे.

७. उभय पक्षकारांच्या कथनावरुन उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| **अनु.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी सकृतदर्शनी त्यांची बाजू सिध्द करतात का? | नाही. |
| २ | न्यायाचे समतोलत्व वादीचे बाजूने आहे का? | नाही. |
| ३ | तूर्तातूर्त मनाई आदेश पारीत न केलेस वादीचे नुकसान होणार आहे का? | नाही. |
| ४ | अंतिम आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## —: कारणमिमांसा :—

८. वादीतर्फे विधिज्ञ श्री. आर. डी. आंबिये व प्रतिवादी क्र. १ तर्फे विधिज्ञ श्री.एम.आय.सय्यद यांचा युक्तीवाद ऐकला.

९. वादीतर्फे विधिज्ञ यांनी प्रतिवादी क्र. १ याने त्याचे म्हणणे व लेखी कैफियत मध्ये दावा मिळकतीमध्ये त्याची एकटयाची मालकी असलेचे कथन केले असून प्रतिवादी क्र. ४ यांनी घर बांधलेचा बचाव घेतला आहे आणि प्रतिवादी क्र. १ व ४ मध्ये संगनमत आहे असे नमूद केले. त्यानंतर त्यांनी प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी प्रतिवादी क्र. ४ यांना कुलअखत्यार नेमलेचे आणि प्रतिवादी क्र. ४ ह्या प्रतिवादी क्र. १ यांच्या पत्नी असलेची वस्तुस्थिती विषद केली. वादी हे दावा मिळकतीचे सह—हिस्सेदार असून तशी सातबारा पत्रकी वादीच्या नावाची नोंद असलेने वादीने दावा मिळकतीमधील त्यांची कब्जेवहीवाट सिध्द करणेची आवश्यकता नाही आणि प्रतिवादी क्र. १ याने वादीचा दावा मिळकतीतील हिस्सा नाकारला नसलेचे नमूद करुन एखादा सह—हिस्सेदार एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचे

स्वरुप बदलत असेल तर हे कृत्य इतर सह–हिस्सेदारांच्या कायदेशीर हक्काचा भंग होणारे आहे असे त्यांनी नमुद केले. या सर्व कारणास्तव त्यांनी वादीचा अर्ज मंजूर होणेची विनंती करुन त्यांच्या युक्तीवादाच्या पुष्ठयर्थ्य त्यांनी खालील न्यायनिर्णयातील न्यायतत्वाचा आधार घेतला.

1. **सर्जेराव मारुती साठे वि. प्रल्हाद लक्ष्मण साठे २०१०(२) ऑल.एम.आर. पान क्र. ५४४.**
2. **जोस कॅटानो वाझ वि. जूलीया लिओकॅडीआ लुक्रेशिया फर्नांडीस ए.आय.आर. १९६९ गोवा, दमण आणि दिव, पान क्र. ९०.**

१०. याउलट प्रतिवादी क्र. १ तर्फे विधिज्ञ यांनी दावा मिळकत क्र. ५ मध्ये प्रतिवादी क्र. ४ यांनी घर बांधले असून ही कूळ कायद्याची जमिन नाही आणि जरी प्रतिवादी क्र. ४ ही प्रतिवादी क्र. १ ची पत्नी असली तरी त्यांचा या घराशी काहीही संबंध नाही असे नमूद कले. हे बांधकाम बेकायदेशीर असते तर ग्रामपंचायतीने कार्यवाही केली असती आणि दावा मिळकतीच्या स्वरुपात बदल केलेबाबत वादीने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही याकडे त्यांनी लक्ष्य वेधले. सदरचे बांधकाम होवून ४ वर्षे झाली असून वादी हे प्रतिवादी क्र. ४ विरुध्द कोणतीही दाद मागत नसलेने अर्ज निष्फळ झाला असलेने नामंजूर होणेची विनंती केली.

११. मी उभय पक्षकारांचे कथन, दाखल कागदोपत्री पुरावा, तर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद व दाखल न्यायनिर्णय यांचे अवलोकन केले आहे.

**<u>मुद्दा क्र. १ बाबतः–</u>**

१२. उभय पक्षकारांमध्ये दावा मिळकतींचे वर्णन आणि वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या नातेसंबंधाबाबत वाद नाही.

१३. दावा मिळकती अ.क्र. १ ते १२ या वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या हिंदू एकत्र कुटुंबाच्या मिळकती असून त्यामध्ये अद्यापही सरस निरस मानाने धडेवाटप झालेले नसताना प्रतिवादी क्र. १ हा वादी व अन्य प्रतिवादींची संमती न घेता दावा मिळकत क्र. ५ मध्ये बेकायदेशीरपणे बांधकाम करुन दावा

मिळकतींचे स्वरुप बदलत आहेत अशी वादीची बाजू आहे. नि.६ ते १७ वर वादीने दाखल केलेल्या दावा मिळतींचे सन २०१६—२०१७ करीता सातबारा उताऱ्याची सहीसूद नक्कल पाहता भोगवटादार सदरात वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांची नांवे नमूद आहेत. यावरुन दावा मिळकतींबाबत वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचेत सरसनिरस मानाने धडेवाटप झालेले हे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

१४. प्रतिवादी क्र. १ यांनी नि.६५ सोबत अ.क्र.२ वर मुंबई कूळ वहीवाट व शेत जमिन अधिनियम १९४८ चे कलम ३२—म अन्वये तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकारण, सावंतवाडी यांनी दि. ०७/०८/२०१२ रोजी प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचे नांवे पारीत केलेले खरेदी प्रमाणपत्र पाहता दावा मिळकत क्र. २, ६, ७ व ८ या मिळकती प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी मूळ मालकांकडून खरेदी केलेचे सकृतदर्शनी स्पष्ट होते. परंतू या मिळकती प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी सन २०१२ मध्ये खरेदी करुन देखील नि.७, नि.११, नि.१२ व नि.१३ वर दाखल दावा मिळकत क्र. २, ६, ७ व ८ या मिळकतींच्या सन २०१६—२०१७ करीता सातबारा उता—यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ यांचे नांव कशाचे आधारे नोंद झाले हे स्पष्ट करणारा सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा उभय पक्षकारांपैकी कोणीही दाखल केलेला नाही. दावा मिळकत क्र. ५ याचा सर्व्हे क्र. ७४ (जुना क्र. १८८) हिस्सा नं. १३ ही एकूण हे. ०—०८—० आर, पो.ख. हे. ०—०२—० आर एकूण हे. ०—१०—० आर क्षेत्राची मिळकत आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी नि.६५ सोबत प्रतिवादी क्र. ४ यांचे नांवे दाखल केलेला गाव नमुना—८अ उता—याची सहीसूद नक्कल पाहता सर्व्हे क्र. ७४ हिस्सा नं. १३ ही एकूण हे. ३.३२ आर क्षेत्राची मिळकत आहे आणि दावा मिळकत क्र. ५ पेक्षा या मिळकतीचे क्षेत्र खूप जास्त आहे. यावरुन दावा मिळकत क्र. ५ व ही मिळकत भिन्न आहे हे स्पष्ट होते. नि.६५ सोबत अ.क्र. १ वरील दाखल गाव नमूना—८अ उतारा हा दावा मिळकत क्र. १, २, ४, ६ ते १२ या मिळकतीं वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नांवे एकत्रित समाईकांत असलेचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

१५. महत्वाची बाब म्हणजे दावा मिळकतींमध्ये प्रतिवादी मिळकतीचे स्वरुप बदलत असलेबाबत वादीने कोणताही सकृतदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. नि.४ अ.क्र. १३ सोबत दाखल अर्ज पाहता वादीने दि. २६/१२/२०१७

रोजी प्रतिवादी क्र. १ हे सर्व्हे नं. ७४ हिस्सा नं. १३ या मिळकतीत बेकायदेशीरपणे बांधकाम करीत असून हे बांधकाम थांबवावे म्हणून हा तक्रार अर्ज ग्रामसेवक, ग्रामपंचायत कारीवडे यांचेकडे दिलेला दिसतो. त्यानंतर दि. १८/०१/२०१८ रोजी हा दावा दाखल झालेला आहे. दरम्यान सदर ग्रामपंचायत मार्फत काही कार्यवाही केली गेली की कसे? याबद्दल कोणताही सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा वादीने दाखल केलेला नाही. दावा मिळकत क्र. ५ मध्ये प्रतिवादी क्र. १ याने घराचे बांधकाम झालेचे मान्य केले आहे. परंतु हे घर त्याची पत्नी प्रतिवादी क्र. ४ यांनी बांधलेचे स्पष्ट केले आहे. नि.६४ सोबत अ.क्र. १ वर दाखल ग्रामपंचायत मालमत्ता क्र. १२५३ चा २०१९—२०२० चा कर आकारणी उतारा प्रतिवादी क्र. ४ यांचे नांवे हे घर असलेचे दर्शवितो. नि.५६ सोबत दाखल पावत्यावरुन या घर मिळकतीच्या सन २०१७ ते सन २०२० पर्यंतचा प्रतिवादी क्र. ४ यांनी कर भरलेचे सकृतदर्शनी स्पष्ट होते. तथापि, प्रतिवादी क्र. ४ यांचे नांवे असलेले सदरचे घर दावा मिळकत क्र. ५ मध्ये असलेबाबत किंवा दावा मिळकत क्र. ५ मध्ये स्वत: प्रतिवादी क्र. १ चे नांवे घर असलेबाबत अथवा प्रतिवादी क्र. ४ चे नांवे प्रतिवादी क्र.१ हे स्वत: असे घर बांधत असलेबाबत वादीने सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

१६. तथापि, प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ४ चे नांवे असलेले हे घर दावा मिळकत क्र. ५ मध्ये असलेचे मान्य केले आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी नि.५६ व नि.६५ सोबत दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन सकृतदर्शनी सदर घराचे बांधकाम पूर्ण होवून त्याची कर आकारणी नोंदवहीत सदर ग्रामपंचायतीकडून नोंदही घेतली गेलेचे स्पष्ट होते. यावरुन वादीच्या अर्जातील तुर्तातुर्त मनाई दादची मागणी निष्फळ झाली आहे या प्रतिवादी कं. १ यांच्या विधिज्ञांच्या युक्तीवादात तथ्य वाटते. महत्वाची बाब म्हणजे वादीने निव्वळ प्रतिवादी क्र. १ विरुध्द अंतरिम दाद मागीतली आहे. त्यांची पत्नी या दाव्यात प्रतिवादी क्र. ४ म्हणून नेमलेली असून देखील वादीने थेट तिच्याविरुध्द कोणतीही अंतरिम दाद मागितलेली नाही. सद्य परिस्थितीत दाखल पुरावा पाहता प्रतिवादी कं. १ हे दावा मिळकत क्र. ५ वा अन्य मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करीत असून वादीच्या न्याय हक्काचा भंग करीत आहे असे सकृतदर्शनी वादीने सिध्द केलेले नाही.

१७. मी वादीतर्फे दाखल न्यायनिर्णयांचे अवलोकन केले आहे. **प्रल्हाद साठे** या न्यायानिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ आदेश ४१ नियम २७ अन्वये अपिलाच्या कार्यवाहीमध्ये दाखल करणेत आलेला जादा पुरावा, पूर्वी झालेल्या वाटपानुसार हिंदू एकत्र कुटुंबातील सह—हिस्सेदार त्यांचा हिस्सा विभक्तपणे उपभोगत असतील आणि तशा स्वरुपाच्या मिळकतींच्या महसूल अभिलेखी नोंदी असतील तर वाटप पूर्वी झालेले आहे असे गृहीत धरावे आणि हिंदू एकत्र कुटुंबातील ज्येष्ठ मुलगा विभक्त झाला असेल तर अशा ज्येष्ठ मुलाने त्या कुटुंबाच्या कूळहक्काच्या जमिनीची केलेली खरेदी ही त्याची वैयक्तिक खरेदी नसून त्या कुटुंबातील इतर सह—हिस्सेदारांच्यावतीने देखील आहे आणि त्यांना या मिळकतीत हिस्सा आहे असे नेमून दिले आहे. या ठिकाणी यापूर्वीच नमूद केलेप्रमाणे जरी दावा मिळकत क्र. २, ६, ७ व ८ या मिळकतीचे खरेदीखत प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचे नांवे असले तरी या मिळकतींचे सातबारा उतारे वादी व प्रतिवादी क्र. १ यांचे देखील नांवे प्रतिवादी क्र. २ ते ४ सोबत भोगवटादार म्हणून दर्शवितो. त्यामुळे वादी व प्रतिवादी क्र. १ यांना या मिळकतीत हिस्सा नाही असे सकृतदर्शनी म्हणता येणार नाही.

१८. **जोस वाझ** या न्यायनिर्णयामध्ये सह—हिस्सेदार मिळकतीच्या स्वरुपात बदल करत असेल आणि दुसरा सह—हिस्सेदार त्वरीत याबाबत दाद मागत असेल तर मनाईबाबत हुकुमनामा पारीत करता येतो असे मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ गोवा यांनी नेमून दिले आहे. या ठिकाणी यापूर्वीच नमूद केलेप्रमाणे ज्या घराच्या बांधकामाबाबत वादी प्रतिवादी क्र. १ विरुध्द तुर्तातुर्त मनाईची दाद मागत आहे, ते घर प्रतिवादी क्र. ४ चे नांवे असून या घराचे बांधकाम पूर्ण झाले आहे. शिवाय स्वत: वादी प्रतिवादी क्र. ४ विरुध्द कोणतीही अंतरिम दाद मागत नाहीत. त्यामुळे वादीला या दोन्ही न्यानिर्णयातील न्यायतत्वाचा आधार घेता येणार नाही असे माझे नम्रपणे मत आहे. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करता वादीने सकृतदर्शनी त्यांची बाजू सिध्द केलेली नाही असे मी ठरवून **मुद्दा क्र. १** चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ व ३ बाबत</u>:—**

१९. वादीने जरी दावा मिळकतींत त्यांचा समाईकांत कायदेशीर हिस्सा असलेचे सकृतदर्शनी सिध्द केले असले तरी प्रतिवादी क्र. १ हे त्यांच्या कोणत्याही कृतीने वादीच्या या न्याय हक्काचा भंग करीत आहे असे वादीने सकृतदर्शनी सिध्द केलेले नाही. त्यामुळे तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत न झालेस वादीचे नुकसान होणेचे कारण नाही. यावरुन न्यायाचे समतोलत्व वादीचे बाजूने नाही हे देखील स्पष्ट होते. मी तसे ठरवून **मुद्दा क्र. २ व ३** चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u>:—**

२०. वादीने तुर्तातुर्त मनाईची दाद मंजूर होणेस आवश्यक असलेल्या तीन अटी सकृतदर्शनी बाजू, न्यायाचे समतोलत्व व अतोनात नुकसान सिध्द् केल्या नाहीत. त्या कारणे अर्ज मंजूर होणेस पात्र नाही या निष्कर्षापर्यंत मी येत असून **मुद्दा क्र. ४** चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**—: :— <u>आदेश</u> —: :—**

१. नि. ५ वरील तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजूर करणेत येतो.

Digitally signed by Rupali Rajanikant Bedagkar
Date: 2020.07.21 12:10:18 +0530

(आर.आर.बेडगकर)
दिनांक —२०/०७/२०२०.
दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर),
सावंतवाडी.